दि. २०/०४/२०१९ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या हस्ते पोलीस क्लब, पहीला मजला, आझाद मैदान, मुंबई येथे आयोजीत करण्यात आलेल्या गुन्हे परिषदेत बक्षिस वितरण कार्यक्रमात सोबत जोडण्यात आलेल्या माहे **फेब्रुवारी** –२०१९ या महिन्याचा " **BEST DETECTION OF THE MONTH** " चा पुरस्कार खालीलप्रमाणे प्रदान करण्यात आला आहे.

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे फेब्रुवारी – २०१९

| शाहुनगर पोलीस ठाणे परिमंडळ–५ | गु.र.क्र. ३०/२०१९, कलम ३०२,२०१,१२०(ब) भादवि. |
|---|---|

–:' **दुहेरी खून** ':–

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :– यातील फिर्यादी नामे श्री. मेहराज हुसेन इन्तजार सय्यद, वय ३३ वर्षे हे रूम नं. १३०६, डायमंड अपार्टमेंन्ट, जस्मीन मिल रोड, माहीम (पूर्व) मुंबई येथे त्यांची पत्नी व मुलासमवेत एकत्रीत राहत असुन ते इन्फीनिक्स प्रा.लि. अंधेरी सिप्झ, मुंबई या ठिकाणी प्रोसेस असोशिएटस् म्हणुन गेल्या दोन वर्षापासुन नोकरी करतात. फिर्यादी यांच्या पत्नीचा भाऊ (मेव्हुणा) नामे श्री.इलियास हुसेन इसरार सय्यद, मु ३६ वर्षे हा त्याची पत्नी नामे सौ. तेहसिन जेहरा इलियास हुसेन सय्यद, वय ३४ वर्षे, तिची मुलगी नामे कु. समाना फातीमा, वय ७ वर्षे, व दुसरी मुलगी कु.आलीया, वय २ वर्षे ६ महीने यांचेसह ते राहत असलेल्या बिल्डीगमध्ये रूम नं. १०१० येथे राहण्यास आहेत. फिर्यादी यांचा मेव्हुणा नामे श्री. इलियास याचा हॅन्ड ऍम्ब्रायडरी (जरीचे काम) चा कारखाना असुन तो रूम नं.२९४,२९५, बी.पी.टी.रेल्वे लाईन, गेट नं.४, इस्लामपुरा, वडाळा (पूर्व) मुंबई या ठिकाणी आहे. सदरचा कारखाना इलियास हा त्याचे वडीलांचे मृत्युनंतर लहानपणापासुन चालवत असुन त्याची पत्नी सौ. तेहसिन जेहरा ही गृहीणी आहे. इलियास व तेहसिन जेहरा यांचे लग्न धार्मिक रितीरिवाजा प्रमाणे झांशी, उत्तर प्रदेश राज्य याठिकाणी मुळ गावी झाले असुन सौ. तेहसिन जेहरा हिचे आई वडील, बहींण भाऊ हे सर्व मुळ गांवी झांशी उत्तर प्रदेश राज्य याठिकाणी राहावयास आहेत.

दिनांक ३१/०१/२०१९ रोजी सकाळी ०६.३० वाजता फिर्यादी हे त्यांच्या कामाचे ठिकाणी रात्रपाळी करून राहते घरी आले व त्यांची पत्नी सौ. निसात फातीमा हि ती नोकरी असलेल्या अल्मारीफ इंग्लीश स्कुलया ठिकाणी शिकवणेकरीता गेली. तसेच त्यांची मोठी मुलगी नामे कु. सकीन फातीमा ही तिचे शाळेकरीता निघुन गेली. फिर्यादी हे राहाते घरी त्यांचा मुलगा नामे कु. मोहसिन वय ५ वर्षे याचेसह झोपले असतांना, सकाळी अंदाजे ११.०० वाजताचे सुमारास त्यांच्या बिल्डींग मधील इस्त्रीवाला नामे रामलखन याने त्यांच्या घराचा दरवाजा ठोठवला व सांगितले की, '' दसवे मालेपे रहेने वाले तुम्हारे रिस्तेदार के घर से बहुत धुवॉ आ रहा है । जल्दी चलो, बिल्डींगवाले तुम्हे बुला रहे है । '' त्यावेळी फिर्यादी हे तात्काळ त्यांच्या मोबाईलसह दहाव्या माळयावर राहाणारा त्यांचा मेव्हणा नामे इलियास याचे घरा समोर आले. सदरवेळी इलियास याचे घरासमोर १२ ते १५ लोक हजर होते. इलियास याचे घराचे भिंतीस असलेला एक्झॉट फॅन मधुन काळया रंगाचा धूर बाहेर येत होता व आतुन काही तरी जळाल्याचा वास येत होता. त्यावेळी तेथील जमलेल्या लोकांनी फिर्यादी यांना सदर घराची चावी तुमच्याकडे आहे का? अशी विचारणा केली त्यावेळी त्यांनी त्यांच्याकडे चावी नसल्याचे सांगितले. त्यानंतर फिर्यादी व तेथील हजर असलेल्या लोकांनी दरवाजावर लाथा मारून तसेच दरवाजाचा हॅन्डल व लॅच उचकटण्याचा प्रयत्न

केला त्यावेळी दरवाजाचे हॅण्डल तुटले परंतु दरवाजा उघडला नाही. त्यावेळी फिर्यादी यांनी तात्काळ इलियास याची पत्नी सौ. तहसिन जेहरा हिचे मोबाईल फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु सदरचा मोबाईल फोन बंद असल्याचे आढळुन आला. त्यानंतर फिर्यादी यांनी तात्काळ इलियास याचा फोन करून त्यास विचारले की, '' तु किधर है । '' त्यावेळी इलियास याने त्यांना ''मै घर के तरफ ही आ रहा हुॅ, क्युॅ क्या हुआ'' त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास '' तु जल्दी आ तेरे घरसे धुवॉ आ रहा है , शायद घर में आग लगी है, और तेहसिन का मोबाईल भी बंद आ रहा है । '' असे सांगीतले. त्यावेळी त्याने त्यांना '' आ रहा हुॅ । '' असे सांगुन मोबाईल कट केला. त्यानंतर फिर्यादी यांनी बिल्डींगचे खाली येवुन त्यांची मोटर सायकल काढली व आजूबाजूच्या परिसरात इलियास याची पत्नी सौ. तेहसिन हिचा शोध घेतला परंतु ती मिळुन आली नाही. सुमारे १० मिनीटानंतर फिर्यादी हे बिल्डींगजवळ परत आले असता, इलियास हा त्याचे ॲक्टीव्हा वरून बिल्डींगखाली आला होता. त्यानंतर दोघे मिळुन दहावे माळयावर त्याचे घरासमोर गेले. त्यानंतर इलियास याने त्याचेकडील चावीने त्याचे घराचे लॅच ( लॉक ) उघडले. त्यानंतर प्रथम इलियास याने घरामध्ये प्रवेश केला व त्याचे मागोमाग फिर्यादी व बिल्डींग मधील इतर रहीवाशी यांनी प्रवेश केला. त्यावेळी सदर रूमच्या किचनमध्ये मोठया प्रमाणात धुर दिसत होता. व किचनमध्ये सौ. तेहसिन जेहरा हि पालथ्या स्थितीत व मुलगी नामे कु. आलिया फातीमा ही उताणे स्थितीत रक्ताचे थारोळयात व जळालेल्या अवस्थेत पडलेल्या दिसून आल्या. तसेच मुलगी नामे कु. आलीया हिचे पायाला आग लागलेली दिसत होती. त्यावेळी फिर्यादी यांनी तिच्या बाजूला पडलेल्या कपडयाने तिच्या पायाची आग विझविण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी इलियास हा घाबरले स्थितीत हॉलमध्ये उभा होता. त्यानंतर सोसायटीतील रहीवाशी यांनी त्यांना पोलीस व ॲम्बुलन्सला फोन केला असल्याचे सांगुन दोघांना धरून किचन मधुन हॉलमध्ये आणले. त्यानंतर शाहुनगर पोलीस स्टेशनचे पोलीस घटनास्थळी आले. पोलीसांसमवेत फिर्यादी पून्हा सदर रूमच्या किचनमध्ये गेले असता त्यांचा मेव्हुणा नामे इलियास याची पत्नी तेहसिन जेहरा व मुलगी नामे आलिया फातिमा यांच्या गळयावर कोणत्यातरी धारदार हत्याराने जखमा केलेल्या दिसून आल्या. तसेच त्यांना जाळण्याचा देखील प्रयत्न केलेला दिसून आला. त्यानंतर पोलीसांनी सौ.तेहसिन जेहरा व मुलगी नामे कु. आलिया फातीमा यांचे मृतदेह ॲब्युलन्समधून सायन हॉस्पिटल येथे घेऊ न गेले.

अशाप्रकारे फिर्यादी यांनी दि.३१/०१/२०१९ रोजी सकाळी ११.०० वा.चे पुर्वी त्यांचा मेहुणा नामे इलियास हुसेन सय्यद याचे राहाते घर रूम नं.१०१०, डायमंड अपार्टमेंन्ट, जस्मीन मिल रोड, माहीम (पूर्व) मुंबई याठिकाणी कोणीतरी अज्ञात इसामाने कोणत्या तरी अज्ञात कारणावरून धारदार हत्याराने सौ.तेहसिन जेहरा इलियास सय्यद वय—३४ वर्षे व मुलगी नामे कु. आलिया फातीमा इलियास सय्यद वय २ वर्षे ६ महीने यांचा गळा कापून त्यांना जाळून जिवे ठार मारले म्हणुन त्यांची अज्ञात इसमाविरूध्द कायदेशीर फिर्याद असल्याबाबत तक्रार केली असता त्यांचा सविस्तर जबाब नोंद करून गुन्हा नोंद केला आहे.

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | :— | श्री. मेहराज हुसेन इंन्तजार सय्यद मु—३३ वर्षे |
| **बळीत** | :— | १) सौ. तेहसिन जेहरा इलियास हुसेन सय्यद, वय ३४ वर्षे व तिची मुलगी<br>२) कु. आलीया फातीमा इलियास हुसेन सय्यद, वय २ वर्षे ६ महीने |
| **आरोपी अटक व दिनांक** | :— | १) इलियास हुसेन इसरार सय्यद मु—३६ वर्षे,<br>२) अमरीन फैयाज सय्यद वय—२२ वर्षे,<br>दिनांक ०१/०२/२०१९ |

**तपास कौशल्य** :– सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर व सदरवेळी कोणीही प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नसताना सदर गुन्हा उघडकीस आणणे जिकरीचे होते. त्या अनुषंगाने नमुद गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टीने यातील बळीत मयत महिला व तिचे पती इलियास हुसेन इसरार सय्यद यांचे मोबाईल क्रमांकावर सीडीआर मिळविण्याचे प्रयत्न करण्यात आले. त्यावेळी श्री. इलियास हुसेन इसरार सय्यद याचे मोबाईलवर एक महिला नामे अम्ररीन ही त्याच्या संपर्कात असल्याचे दिसून आले. त्यानुसार नमुद महिला नामे अम्ररीन फैयाज सय्यद हिस पोलीस ठाणेस आणुन तिच्याकडे तसेच बळीत मयत महिलचे पती इलीयास हुसेन याच्याकडे नमुद गुन्हयाची उकल होण्याच्या दृष्टिने तपास करण्यात आला. त्यावेळी महिला नामे अम्ररीन फैयाज सय्यद हिने घटनेच्या दिवशी ती तीच्या घरी असल्याचे व इलियास हुसेन याने तो त्याच्या कामावर असल्याचे सांगीतले. तरी दोघांकडे केलेल्या तपासात त्यांच्यावर संशय निर्माण झाला.

➢ तसेच घटनास्थळ असलेल्या बिल्डींगमध्ये बसविण्यात आलेले एकुण १६ सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे फुटेज तपासण्यात आले असता, घटनेच्या दिवशी बिल्डींगच्या बाहेर जाणाऱ्या गेटमधुन एक संशयास्पद बुरखाधारी महिला बाहेर जात असल्याचे दिसुन आले. तरी पोलीस ठाणे हद्दीत बसविण्यात आलेल्या एकुण ३० सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने सीसीटीव्ही फुटेज तपासून नमुद संशयास्पद बुरखाधारी महिला ही कोठुन जाते याबाबत तांत्रिकदृष्टया तपास करण्यात आला. त्यानुसार सदर बुरखाधारी महिला जस्मीन मिल रोड, धारावी, मुंबई ठिकाणाहुन एका टॅक्सीमधुन जात असल्याचे दिसुन आले. तरी नमुद फुटेजच्या आधारे सदर टॅक्सीचा क्रमांक प्राप्त करून नमुद टॅक्सीचालक यांस पोलीस ठाणेस आणण्यात आले. त्यावेळी त्याच्याकडे नमुद गुन्हयाच्या अनुषंगाने सविस्तर तपास केला असता त्याने घटनेच्या दिवशी बुरखाधारी महिलेस फाईव्ह गार्डन ते डायमंड अपार्टमेंन्ट, माहीम (पूर्व) येथे सोडल्याचे व सदर महिलेस पुन्हा फाईव्ह गार्डन येथे सोडल्याचे सांगीतले. त्याबाबत फाईव्ह गार्डन येथे बाजुस नमुद पथकाने सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली असता, बुरखाधारी महिला ही फाईव्ह गार्डन येथुन एक्टीव्हा मोटार सायकलवरून जात असल्याचे दिसुन आले. तरी सीसीटीव्ही फुटेजचे तांत्रीकदृष्टया तपासणी केली असता सदर महिलेचा चेहरा स्पष्ट दिसुन आला. सदर बुरखाधारी महिला व अम्ररीन फैयाज सय्यद हिचा चेहरा मिळताजुळता असल्याचे स्पष्ट दिसुन आले. तसेच फिंगर प्रिंन्ट एक्सपर्ट यांच्याकडुन घटनास्थळावर घेण्यात आलेले फुट प्रिंन्ट हे देखील तिचेच असल्याचे दिसुन आले. त्यानुसार बाजुस नमुद पथकाने अम्ररीन फैयाज सय्यद व बळीत मयत महिलेचे पती इलियास हुसेन इसरार सय्यद यांच्याकडे नमुद गुन्हा उघडकीस आणण्याच्या दृष्टिने अधिक सखोल तपास केला असता इलियास हुसेन इसरार सय्यद याने त्याचे अम्ररीन फैयाज सय्यद हिचेवर प्रेमसंबंध असल्याचे सांगुन घटनेच्या दिवशी सकाळी त्याने त्याची पत्नी व मुलीचा गळा कापुन त्यांचा खुन करून तो त्याच्या कामावर गेला असल्याचे सांगुन त्यानंतर त्याने त्याची प्रेयसी अम्ररीन फैयाज सय्यद हिला घरी पाठवुन त्यांचे मृतदेह जाळण्यास सांगीतले. तसेच अम्ररीन फैयाज सय्यद हिचेकडे तपास केला असता तीने घटनेच्या दिवशी बळीत महीला व मुलीच्या अंगावर तेल टाकुन त्यांना जाळल्याचे सांगुन, त्यानंतर तीने बळीत महिलेच्या फोनवर 'हम जा रहे है' असा मेसेज टाकुन सदरचा मोबाईल घटनास्थळावर टाकुन दिला असल्याचे सांगीतले.

➢ अशाप्रकारे वर नमुद पथकाने मिळालेल्या माहीतीद्वारे व तांत्रिकदृष्टया तपास करून मिळालेल्या पुराव्याच्या आधारे आरोपी नामे इलियास हुसेन इसरार हुसेन सय्यद, वय ३६ वर्षे व आरोपीत महिला नामे अम्ररीन फैयाज सय्यद, वय २२ वर्षे यांनी पुर्व नियोजीत कट करून बळीत महीला व मुलगी यांचा गळा कापून त्यांचा खुन केल्याने व आरोपीत महिला हिने पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने बळीत महीला व मुलगी यांचा मृतदेह जाळला म्हणुन त्यांना त्यांच्या अटकेची कारणे सांगुन नमुद गुन्हयात कायदेशीररित्या अटक करण्यात आली.

➢ सदरचा संवेदनशील गुन्हा उघड >ाल्याने मा. पोलीस आयुक्तांनी माहे फेब्रुवारी–२०१९ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ या पारितोषिकाने खालील अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानित केले आहे.

**शाहूनगर पोलीस ठाणे, मुंबई तपास पथकातील अधिकारी व अंमलदाराचे नावे खालीलप्रमाणे.**

| अ.क्र. | हुद्दा | संपुर्ण नांव |
|---|---|---|
| १ | सहा. पोलीस आयुक्त | अजिनाथ लक्ष्मण सातपुते (माहिम विभाग) |
| २ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक | सुभाष जयराम सुर्यवंशी |
| ३ | पोलीस निरिक्षक | मंदार वासुदेव लाड |
| ४ | पोलीस निरिक्षक | हनुमंत आप्पा वेताळ |
| ५ | सहा. पोलीस निरिक्षक | पंढरी वैजनाथ कांदे (शिवाजी पार्क पो. ठाणे) |
| ६ | सहा. पोलीस निरिक्षक | संतोष बाळकृष्ण कणसे (माहिम पो. ठाणे) |
| ७ | सहा. पोलीस निरिक्षक | प्रविण विजय खराडे (माहिम पो. ठाणे) |
| ८ | पोलीस उपनिरिक्षक | तुकाराम बाळु डिगे |
| ९ | पोलीस उपनिरिक्षक | वसीम इकबाल शेख |
| १० | पोलीस उपनिरिक्षक | संदीप चंद्रकांत सावंत |
| ११ | पोलीस उपनिरिक्षक | अमोल हणमंत कुलकर्णी |
| १२ | पोलीस उपनिरिक्षक | सुरेश किसन खरात |
| १३ | पोलीस उपनिरिक्षक | स्वप्नील शिवाजी चव्हाण |
| १४ | पोलीस उपनिरिक्षक | सुनिल गणपत पवार (धारावी पो. ठाणे) |
| १५ | पोलीस उपनिरिक्षक | अमोल माधव माळी (धारावी पो. ठाणे) |
| १६ | म. पोलीस उपनिरिक्षक | गौरी तानाजी जगताप |
| १७ | पो.ह.क्रं. २६७३२ | रघुनाथ तुकाराम लडकत |
| १८ | पो.ह.क्रं. २९४१८ | प्रकाश कृष्णा भोसले |
| १९ | पो.ह.क्रं. २७९८३ | सुधाकर नामदेव सांळुखे (धारावी पो. ठाणे) |
| २० | पो.ह.क्रं. २९६४९ | प्रमोद विश्वनाथ जंगम |
| २१ | पो.ना.क्रं. ९६०४७८ | संजय नारायण भिलारे |
| २२ | पो.ना.क्रं. ९६०८८९ | सहदेव काशिराम पडवळ |
| २३ | पो.ना.क्रं. ९६०१८४ | रमेश लक्ष्मण अव्हाड |
| २४ | पो.ना.क्रं. ९८०१३५ | विनोद उत्तम पवार |
| २५ | पो.ना.क्रं. ०१०२९१ | शेखर गोपाळ वणवे |
| २६ | पो.शि.क्रं. ०६१६८१ | अमित गुणाजी तांबे |
| २७ | पो.शि.क्रं. ०९०३७१ | हबीब हमीदउल्ला सय्यद |
| २८ | पो.शि.क्रं. ०९०६६९ | मोहसीनखान तुराबखान पठाण |
| २९ | पो.शि.क्रं. ०९२३५६ | विशाल रघुनाथ भगत |
| ३० | पो.शि.क्रं. ०९३२१६ | महेश विलास लहामगे |
| ३१ | म.पो.शि.क्रं. ११२३६३ | सोनल सतीश वांळुज |
| ३२ | म.पो.शि.क्रं. ११२८५९ | सविता मारूती धोगडे |